# CHALLAN

## MTR Form Number-6

| GRN | MH006646652202627U | BARCODE | | Date | 18/07/2026-10:36:18 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | District And Sessions Court | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Service and Service Fees<br>Court fees realised in cash including Amin and Pro | **TAX ID (Case No.)** | DSCTAX01 |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | CIVIL JUDGE SR DIV WARDHA | **Full Name** | Sai Shradha Deoli Urban Co Operative Credit Society Deoli |
| **Location** | WARDHA | | |
| **Year** | 2026-2027 One Time | **Flat/Block No.** | |

| **Account Head Details** | **Amount In Rs.** | | |
|---|---|---|---|
| | | **Premises/Building** | |
| 0070028801 Court Fee | 5.00 | **Road/Street** | |
| | | **Area/Locality** | |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | |
| | | **Remarks (Party Details)** | |
| | | MHWR03 | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | **Amount In Words** | Five Rupees Only |
| **Total** | 5.00 | | |

| **Payment Details** | STATE BANK OF INDIA | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 00040572026071845600 | CPAGZUTUH9 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 18/07/2026-10:24:38 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : CMHWR032026661634L

Mobile No. : XXXXXX2105



**Print Date 18-07-2026 10:38:25**

CHIEF JUDICIAL MAGISTRATE WARDHA

**कोर्ट विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, कोर्ट नं. 1 वर्धा.**

ORDER

Witness present before Court today deposed the contents of his affidavit to be true & correct. Hence, it is Read & Recorded.
Sd/-
JMFC
18/07/2026

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.07.18 15:57:35 +0530

फौ.समरी.कम्प्लेंट क्रं. 2164/2026 पे. ता. 18/07/2026

**साईश्रद्धा देवळी अर्बन सहकारी पतसंस्था मर्या.देवळी**

**- विरुद्ध –**

**प्रदीप केकापुरे**

**फिर्यादी तर्फे साक्षदार क्रं 1 ची शपथेवर पडताळणी (फिर्यादी स्वत:)**

मी देवाची शपथ घेऊन प्रतीज्ञा पुर्वक खरे सांगते की,

माझे नाव :- श्री. उमेश कृष्णराव डफरे

वय :- 35 वर्षे, कामधंदा – नौकरी – व्यवस्थापक.

राहणार :- नांदोरा (डफरे), तह.- देवळी, जि. – वर्धा

**सरतपासणी :- ॲड. रश्मी व्ही. हिवरे, अधिवक्ता फिर्यादी तर्फे**

व्यवस्थापक
साई श्रध्दा देवळी अर्बन सहकारी पत संस्था, देवळी

1. मी साईश्रद्धा देवळी अर्बन सहकारी पतसंस्था मर्या, देवळी या पतसंस्थेत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे. फिर्यादी पतसंस्थेचा नोंदणी क्रमांक - 498/2003 असा आहे. मला फिर्यादी पतसंस्थेने कोर्टात केसेस दाखल करने व त्यामध्ये साक्ष पुरावे देण्याचे अधिकार दिलेले आहेत. फिर्यादी पतसंस्था यांनी मला नियुक्ती बाबत पारित केलेल्या ठरावाची प्रत मूळ प्रती वरून पडताळणी करून साक्षांकीत केलेली छायांकित प्रत मी दावे तक्रारी सोबत दाखल केली असून त्यातील मजकूर माझ्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर फिर्यादी

CHIEF JUDICIAL MAGISTRATE WARDHA

Scanned with OKEN Scanner

पतसंस्थेच्या अध्यक्षांची सही आहे. मी मूळ प्रत आज रोजी सोबत आणली असून त्याचे अवलोकन करण्याची माझी विद्यमान न्यायालयास नम्र विनंती असून मी दाखल केलेल्या प्रतिस पडताळणी करून त्यास निशाणी क्रमांक ............ देण्यात यावा.

2. मी सदर प्रकरणातील आरोपी ह्यांना ओळखतो तो फिर्यादी पतसंस्थेचा खातेदार आहे. आरोपी ह्यांनी आमच्या फिर्यादी पतसंस्थेकडे दिनांक 21/08/2024 रोजी रक्कम रुपये 99,000/- (नव्याण्णव हजार रुपये फक्त) चे कर्ज वाहन खरेदी करण्याकरिता कर्ज मागणीचा अर्ज केला होता. फिर्यादी पतसंस्थेने आरोपी ह्यांचा कर्ज मागणी अर्ज फिर्यादी पतसंस्था संचालक मंडळाचे दिंनाक 16/09/2017 रोजी झालेल्या बैठकीतील मंजूर ठराव क्रमांक 6 नुसार मंजुर करून आरोपी ह्यांचे रक्कम रुपये 99,000/- चे कर्ज मंजुर केले. आरोपी ह्यांचा वाहन कर्ज खाते क्रमांक – VL – 278 असा आहे. त्यानंतर आरोपी ह्यांनी कर्ज रक्कम रुपये 99,000/- ची उचल केली. कर्ज रक्कम उचलते वेळेस आरोपी ह्यांना कर्ज रक्कम परतफेडी बाबतचे सर्वच नियम समजावून सांगितले होते व ते सर्व नियम व शर्ती आरोपी ह्यांना मान्य होते. आरोपी ह्यांनी सदर कर्ज रक्कम 30 महीने (2 वर्षे 6 महीने) चे मुदतीत मासिक हप्ता रुपये 3,978/- या प्रमाणे व्याजदर 15% वार्षिक दराने परतफेड करण्याचे मान्य करून कर्ज रक्कम उचल पावती व प्रामिसरी नोट (वचन चिठ्ठी) आणि करारपत्रक फिर्यादी पतसंस्थेस आरोपी ह्यांनी करून दिलेले आहे. कर्ज रक्कम

व्यवस्थापक
देवळी अर्बन सहकारी संस्था, देवळी

Scanned with OKEN Scanner

परतफेडी बाबत सर्व अटी व शर्ती आरोपी ह्यांना मान्य होत्या. त्याप्रमाणे आरोपी ह्यांनी कर्जाची परतफेड केलेली नाही.

3. त्यानंतर आरोपी ह्यांना फिर्यादी पतसंस्थेने बरेचदा थकीत कर्ज रक्कम भरणे कामी फोन करून आणि नोटिस पाठवुन वांरवांर विनंती केली असता, आरोपी ह्यांनी स्वतःचे जबाबदारीच्या पूर्तते करिता रक्कम रुपये 1,00,681/- चा धनादेश, धनादेश क्रमांक 305856 फिर्यादी पतसंस्थेस दिला. आरोपी ह्यांनी वाहन खरेदी करण्याकरिता घेतलेल्या कर्ज रक्कमेच्या परतफेडी करिता दिंनाक 05/03/2026 रोजी पंजाब नॅशनल बॅंक, शाखा – ज. ला. ने. वैद्यकीय महाविद्यालय, सावंगी (वर्धा), तहसिल - जिल्हा – वर्धा चा धनादेश, धनादेश क्रमांक – 305856 रक्कम रुपये 1,00,681/- चा दिला. सदर धनादेशावर आरोपी ह्यांची सही आहे. सदर धनादेशाची मुळ प्रत मी अभिलेखावर दाखल केली असून त्यावर आरोपी ह्यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, सबब त्यास निशाणी क्रमांक ................ देण्यात यावा. सदर धनादेश वटविण्या करिता फिर्यादी पतसंस्थेने त्यांचे खाते असलेल्या केनरा बॅंक, शाखा – देवळी तह. – देवळी, जिल्हा - वर्धा येथे दिंनाक 06/03/2026 रोजी जमा करून सादर केला असता, सदर धनादेश दिंनाक 06/03/2026 रोजी न वटविता आरोपीचे खात्यात **“अपर्याप्त निधी” (Funds insufficient)** या कारणास्तव न वटविता दिंनाक 06/03/2026 रोजी परत आला. मी धनादेश परत आल्याबाबतचे धनादेश परतीचे पत्र (चेक रिटर्न मेमो )

व्यवस्थापक
साई श्रध्दा देवळी अर्बन सहकारी पत संस्था, देवळी

अभिलेखावर दाखल केली असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर संबंधित बँक अधिकाऱ्याची सही आहे. तरी त्यास निशाणी क्रमांक............, ........ देण्यात यावा.

4. त्यानंतर (फिर्यादी पतसंस्थेने) मी आरोपीस अधिवक्ता मार्फत नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह धनादेश रक्कम मागणी करिता दिंनाक 23/03/2026 रोजी कायदेशीर नोटिस पाठविला होता. सदर नोटिसवर माझी व माझे वकिलांची सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटिसची स्थळप्रत मी अभिलेखावर दाखल केली असून त्यास निशाणी क्रमांक ......... देण्यात यावा. तसेच मी सदर नोटिस पोस्ट केल्या बाबतची पोस्टाची पावती मूळ प्रत व सदर नोटीस आरोपीस मिळाल्याबाबतची पोच पावती तसेच सदर नोटिस आरोपी ह्यांना दिंनाक 01/04/2026 रोजी मिळाल्याबाबतचा संगणीकृत अहवाल (track record) अभिलेखावर दाखल केले आहे. सदर दस्तऐवज मी अभिलेखावर अनुक्रमे दाखल केले असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे तरी त्यास अनुक्रमे निशाणी क्रमांक ......., ........, ................ देण्यात यावे. यावरून आरोपी ह्यांचे सदर कृत्य हे बँक / पतसंस्थेकडून घेतलेले कर्ज रक्कम परत न करण्याच्या हेतूने आरोपी ह्यांनी सदर धनादेश आरोपी ह्यांचे खात्यात पुरेशी निधी नसल्याची पूर्ण जाणीव आरोपी ह्यांना असून देखील फिर्यादी पतसंस्थेची फसवणूक करण्याच्या हेतूने दिलेला असून आरोपी ह्यांनी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट नुसार गुन्हा केला असून आरोपी शिक्षेस व दंडास पात्र झाला आहे. सबब सदर प्रकरण आरोपी

व्यवस्थापक
साई श्रध्दा देवळी अर्बन सहकारी
पत संस्था, देवळी

MAGISTRATE
L MAGISTRATE
Scanned with OKEN Scanner

विरुद्ध फिर्यादी पतसंस्थेस दाखल करणे अनिवार्य झाले असून सदर प्रकरण हे कालमर्यादित दाखल केले आहे. तरी फिर्यादी संस्थेला आरोपी ह्यांचे कडून कर्ज रक्कमे करिता दिलेल्या धनादेशाची रक्कम व्याजासह व सदर प्रकरणाच्या खर्चासह मिळण्यात येवून कायदेशीर तरतुदींनुसार आरोपी ह्यांना दंड रक्कमेसह शिक्षा देण्यात यावी.

वर्धा :

दिंनाक : 18/07/2026

व्यवस्थापक
साई श्रध्दा देवळी अर्बन सहकारी
पत संस्था, देवळी
शपथपत्र करणार

## सत्यापन

मी नामे उमेश कृष्णराव डफरे, वय : 35 वर्षे, व्यवसाय :- नौकरी – (व्यवस्थापक), राहणार :- नांदोरा (डफरे), तह.-देवळी , जि. वर्धा., सत्यापित करतो की, वरील पडताळणी /पुरावा शपथ पत्रातील परीच्छेदा मध्ये लिहिलेला संपूर्ण मजकूर हा माझ्या माहिती व सांगण्यानुसार लिहिलेला असून संपूर्ण सत्य व बरोबर लिहिलेला आहे.व तो मी वाचुन व समजून घेऊन आज दिंनाक 16/07/2026 रोजी वर्धा मुक्कामी सत्यापन लेखावर सही केली आहे.

व्यवस्थापक
साई श्रध्दा देवळी अर्बन सहकारी
पत संस्था, देवळी
सत्यापन करणार

16 th July 2026
Umesh s/o Krushnarao Dafare aged 35 yr R/o Nandora (Dafare) Ta. Deoli Dist. Wardha.
R.V. Hiware

मी सत्यापन करणार ह्यांना ओळखतो,त्यांनी माझे समक्ष यावर सही केली आहे.

16-07-26
Asstt. Supdt.

16 JUL 2026

(अ‍ॅड. रश्मी व्ही. हिवरे, वर्धा)

16/7/2026
व्यवस्थापक
साई श्रध्दा देवळी अर्बन सहकारी
पत संस्था, देवळी

Scanned with OKEN Scanner

## SAISHRADHA DEOLI URBAN SAHKARI PATSANSTHA R.NO.498 DEOLI.



NAME OF EMPLOYEE : UMESH K DAFARE
DESIGNATION : MANAGER
BRANCH : DEOLI
ADDRESS : AT POST NANDORA TAH DEOLI DIST WARDHA
DATE OF BIRTH : 24/04/1988

SIGNATURE OF EMPLOYEE

SIGN & STAMP

Verified from original

Asstt. Supdt
...of CJM Wardha

20 APR 2026

Scanned with OKEN Scanner